## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक १४/०७/२०१७ (शुक्रवार)
## (संध्याकाळ)

---

### चोरी हा गुन्हा उघडकीस

पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावर वार्ड नं. १ चिचोली येथे दिनांक ११/०७/२०१७ चे २२.०० वा. ते १२/०७/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे- शुभम उर्फ रंगा भगवान रंगारी, वय २२ वर्ष, रा. चिचोली वार्ड नं १, खापरखेडा याने नमुद घटनास्थळी फिर्यादी नामे- संपत रामाजी खंडाते, वय ३९ वर्ष, रा. वार्ड नं. १ चिचोली यांचा विवो कंपनीचा मोबाईल फोन किंमत ९९९०/- रू, सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन किमंत १०००/- रू, एचएमटी कंपनीची घडी किमंत १५००/- आणि अंगातील फुलपॅन्ट मध्ये असलेले २७००/- रू. असा एकुण १५,१९०/- रूपयाचा मुद्देमाल घटनास्थळाहुन चोरून नेला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण विभागाने उकल करून आरोपी निष्पन्न केला व फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी विरुध्द कलम ३८० भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा अटक करण्यात आली असुन आरोपीच्या ताब्यातुन एकुण ७ मोबाईल फोन प्राप्त करण्यात आले आहे. सदर कारवाही ही पोलीस निरीक्षक श्री. अशोक साखरकर यांचे मार्गदर्शनात सहायक फौजदार श्री. नामदेव धांडे, पोलीस नाईक श्री. दिनेश आधापुरे, सुरेन्द्र वासनिक, पोलीस शिपाई श्री. विरेन्द्र नरड, श्री. नितेश पिपरोदे, श्री. गितेश झडाने यांनी केली. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. नामदेव धांडे हे करीत आहे.



**अटक आरोपी सह पो.स्टे. खापरखेडा येथील अधिकारी व कर्मचारी**

## फसवणुक

**१)पो.स्टे. उमरेड** :- अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा कारगाव येथे दिनांक १३/०७/२०१७ चे पुर्वी आरोपी नामे-१) ज्ञानेश्वर सिताराम आतीलकर, वय ६० वर्ष २) नरेंद्र बोकडे, वय ४५ वर्ष व दोन महीला आरोपी सर्व रा. उमरेड यांनी संगणमत करूण श्रध्दा वृध्दाश्रम भिवापुर, नागपुर येथे संस्थेवर अर्जदार व त्यांचे साक्षीदार हयांना नौकरीवर लावुन देतो असे आश्वासन देवुन त्यांचे कडुन नगदी व चेक व्दारे ३५,००,०००/-रूपय घेवुन नौकरीचे आमिष दाखवुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- सौ. संगीता रविकांत सदावर्ती, वय ३३ वर्ष, रा. जोगिठाणा पेठ, उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ४२०,३४ भादंवि. अन्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहासक पोलीस निरीक्षक श्री. सुनिल लांघी हे करीत आहे.

**२)पो.स्टे. रामटेक** :- अंतर्गत ०५ किमी अंतरावर मौजा चिचोळा येथे दिनांक २३/०६/२०१७ चे १४. ०० वा. यातील आरोपी नामे-१) निलेश इठ्ठुलाल दमाहे, वय ३५ वर्ष २)भरत आनंदराव माहेर, वय ४५ वर्ष व एक महीला आरोपी सर्व रा. चिचोळा यांनी संगणमत फिर्यादी नामे- सुजीत भारत मोहाड, वय २५ वर्ष, रा. चिचोळा यांचे कडुन वेळोवेळी १,६५,०००/-रू घेवुन नौकरीवर लावुन देण्याचे आमीष दाखवुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादीयांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांन विरुध्द कलम ४२०,३४ भादंवि. अन्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहासक पोलीस निरीक्षक श्री. महेश नुरीया हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**